Pench Tiger Reserve MAHARASHTRA

महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय

पहिला माळा, एफ.डी.सी.एम. भवन, ३५९/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४० ०३६
दुरध्वनी क्र. ०७१२ - २८११९२१ Email ID: dfowlpench@mahaforest.gov.in Website: - www.mahapenchtiger.com

क्रमांक : कक्ष-३/दक्षता/३६१२/२२-२३ नागपूर, दिनांक 09/02/23

**विषय :-** *"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रम आयोजीत करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-३/दक्षता/३४९८/२०-२१ दि.१०/०२/२०२२

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वनवनवा हंगाम २०२२ मध्ये गावकऱ्यांच्या सहकार्याने *"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रम राबविण्यात आले होते. यामध्ये गावांनी जंगलातील आग रोखण्यासाठी केलेल्या सर्वांगीण प्रयत्नांची एक स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये सहभागी होणे करिता गावकऱ्यांचा ठराव आवश्यक होते.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात उपस्थित असलेल्या एकूण ३९ गावांपैकी ३७ गावांनी या कार्यक्रमात सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. सर्व गावांमध्ये जनजागृतीसाठी, संवेदनशील वनक्षेत्रात गस्त घालण्यासाठी आणि आगीच्या घटना घडल्यास वनविभागाला मदत करण्यासाठी स्वयंसेवी गस्त पथके तयार करण्यात आली होती. एकूण २९९ युवक अशा पथकांचा भाग होते आणि त्यांनी अग्निशमन हंगामाच्या ३ महिन्यांच्या कालावधीत ८० वेळा गस्त घातली. या कार्यक्रमामुळे २०२१ मध्ये एकूण ६५९ हेक्टर जळलेल्या वनक्षेत्रात एकूण ६७% घट झाली आणि २०२२ मध्ये ते २१८ हेक्टरवर आले. शिवाय, आगीच्या घटनांमध्ये ५२% घट झाली जी २०२१ मध्ये ६३ होती आणि खाली आली. २०२२ मध्ये ३० आणि आगीच्या केवळ ३ घटना शेत आणि गावाच्या लगतच्या होत्या.

आगीच्या घटनांचा मूल्यमापन करण्यासाठी श्री गिरीश वाशिष्ठ, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी, श्री अतुल देवकर, सहाय्यक वनसंरक्षक, (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प आणि श्री मंदार पिंगळे, सातपुडा फाउंडेशनचे यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली. *"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रम पारशिवणी तालुक्यातील कोलितमारा, सुरेरा व घाटपेंढरी या गावांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. संबंधित गावांच्या सरपंच आणि ईडीसी अध्यक्षांना अनुक्रमे रु.५१०००, रु.३१००० आणि रु.२१००० देण्यात आले.

या कार्यक्रमामुळे गावांमध्ये वन संरक्षणासाठी आधार तयार करण्यात मदत झाली आहे आणि जंगलातील आगीच्या घटनांना आणखी रोखण्यात मदत होईल. पेंच व्याघ्र प्रकल्पाने २०२३ च्या वनवनवा हंगामातही हा कार्यक्रम सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

त्या अनुषंगाने अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

**गावाने *"अंगार मुक्त पेंच"*( Fire Free Pench)कार्यक्रम करिता करावयाची कामे**

१) महाराष्ट्र शासनाच्या उज्वला गॅस योजना, डॉ शामा प्रसाद मुखर्जी गस योजना घेणे करिता ग्राम सभा ठराव पारित करणे. प्रत्येक घरी गॅस यावा या करिता पाठपुरावा करणे.

२) ग्राम पंचायत च्या मार्गदर्शनात जंगलात शेती शिवारात आग लागू नये या करिता गावातील संयुक्त वन व्यवस्थापन समिति, तंटा मुक्त समिति ची एकत्र मिटिंग घेणे व आग नियंत्रणा साठी चर्चा करुन नियम बनवने.

३) जंगलात शेती शिवारात आग लागू नये या करिता गावातील मिटिंग मध्ये बनवलेले नियम हे गावातील प्रमुख याने दवंडी देणे. महिन्यातून किमान एकदा या नियमांची मुनादी देणे. हि नियमावली चावडी वर लावणे चावडी वाचन करणे.

४) गावकर्यांनी गावातील १०-१५ तरुणाची आगीच्या घटनांवर लक्ष ठेवणारी आग नियंत्रण टीम तयार करणे. गावाशेजारील जंगलात आग लागल्यास वनरक्षकांच्या मदतीला जाणे.

५) गावकर्यांनी जंगलात आग लागेल अश्या गोष्टी अशी कामे करु नये. जसे कि शेतातील कचरा गोळा करुन जाळू नये, धुरे जाळू नये.

६) मोहाफुल वेचतांना त्या झाडाखालील कचरा झाडून मग फुले वेचावी. मोहाच्या झाडाखाली आग लावू नये. मोह फुले वेचतांना साडी, ताडपत्री चा वापर करावा.

७) तेंदू पत्ता पाने झाडांना जास्त यावी, या करिता आग जंगलात लावू नये. हा या बाबतीत गैरसमज आहे.

८) गवत जास्त उगवावे या करिता जंगलात आगी लावणे थांबवावे.

९) गावात जनावरांच्या चराई करिता कुरण विकास कार्यक्रम घेणे. गावातील जनावरांकरिता चराई नियोजन क्षेत्र विकसित करणे. त्या करिता चराई बंदी कुऱ्हाड बंदी सारखे नियम करावे.

१०) गावाशेजारील जंगलात आग लावू नये या करिता नावीन्यपूर्ण संकल्पना राबविणे

**_"अंगार मुक्त पेंच"_( Fire Free Pench)कार्यक्रमाचे मूल्यांकन कोण करेल कसे करेल**

१. या स्पर्धेकरिता उपरोक्त मुद्या पैकी जे गाव सर्वात जास्त मुद्यावर काम करेल असे पहिले ३ गाव या बक्षिसाचे मानकरी असतील.

२. प्रत्येक गावातील वनपाल/वनरक्षक/टीम यांनी प्रामाणीकपणे आपल्या अधिनस्त असलेल्या गावाचे मूल्यांकन ३ महिने करतील.

३. पेंच व्याघ्र प्रकल्पातंर्गत अंगार मुक्त गावाची पाहणी करण्याकरीता गठीत समिती, वनरक्षक, वनपाल यांचे मदतीने मुल्यांकन करून नोंदी घेत राहतील.

४. वनपाल, वनरक्षक, गावकरी यांनी आपल्या गावाचे वरील १५ मुद्यावर आधारित फोटो काढावे, व सादर स्पर्धेच्या ग्रुप वर टाकावे.

५. दिनांक १५ फेब्रुवारी ते १५जून २०२३ पर्यंत हि स्पर्धा चालेले. सर्व वनपाल वनरक्षक यांनी १५ जून २०२३ मुल्यांकन नोंदीचा पंधरवाडी अहवाल विभागीय कार्यालय येथे सादर करावा.

६. स्पर्धेत सहभागी ३९ गावांपैकी चांगले काम केलेल्या ५ गावाचे अंतिम मूल्यांकन खालील समिती करतील.

तरी सदर अंगार मुक्त क्षेत्राच्या स्पर्धेचे परीक्षण करणेकामी खालील प्रमाणे समितीची स्थापना करण्यात येत आहे. सदर समितीने अंगार मुक्त गाव स्पर्धेचे परीक्षेण करुन विजेच्या गावांची निवड करावी.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. अतुल देवकर | सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर |
| २ | श्री. किरण पाटील | सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर |
| ३ | श्री. मंदार पिंगळे | सातपुडा फॉन्डेशन |
| ४ | श्री. अंजिक्य भटकर | मानद वन्यजीव रक्षक, नागपूर |

(डॉ. प्रभु नाथ शुक्ल)
उपसंचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर

प्रति,

१) श्री. अतुल देवकर, सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
२) श्री. किरण पाटील, सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
३) श्री. मंदार पिंगळे, सातपुडा फॉन्डेशन
४) श्री. अंजिक्य भटकर, मानद वन्यजीव रक्षक, नागपूर

प्रतिलिपी :- वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलिपी :- सहाय्यक वनसंरक्षक अशिप्रक,/रोहयो व वजी पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत.

प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र अधिकारी सर्व यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस. सर्वांनी सहपत्रित स्पर्धेचे नियम वाचून त्यानुसार कार्यवाही करावी. याबाबतचा पंधरवाडी अहवाल विभागीय कार्यालयात सादर करावा.

Pench Tiger Reserve MAHARASHTRA | महाराष्ट्र वन विभाग | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय**

पहिला माळा, एफ.डी.सी.एम. भवन, ३५९/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४० ०३६

दुरध्वनी क्र. ०७१२ - २८११९२१ Email ID: dfowlpench@mahaforest.gov.in Website: - www.mahapenchtiger.com


---

क्रमांक : कक्ष-३/दक्षता/३६१५ /२२-२३ नागपूर, दिनांक १०/०२/२३

प्रति,

१) श्री. अतुल देवकर, सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
२) श्री. किरण पाटील, सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
३) श्री. मंदार पिंगळे, सातपुडा फॉन्डेशन
४) श्री. अंजिक्य भटकर, मानद वन्यजीव रक्षक, नागपूर

विषय :- *"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रमाचे गुण देण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वनवनवा हंगामात आगीच्या घटना होत असून सदर आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच गावकऱ्यांच्या सहकार्याने *"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रम आयोजीत असून त्या अनुषंगाने अटी व शर्तीप्रमाणे खालील विषयांच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या गुणांची यादी.

***"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)* कार्यक्रमा करिता करावयाची कामे**

१) महाराष्ट्र शासनाच्या डॉ शामा प्रसाद मुखर्जी गॅस योजना घेणे करिता ग्राम सभा ठराव पारित करणे. **(गुण-१०)**
२) ग्राम पंचायत च्या मार्गदर्शनात जंगलात शेती शिवारात आग लागू नये या करिता गावातील ग्राम परीसर विकास समिती, तंटा मुक्त समिति ची एकत्र मिटिंग घेणे व आग नियंत्रणा साठी चर्चा करुन नियम बनवने. त्यांची अमंजबजावणीबाबत दर पंधरवाडयास आढावा घेणे. **(गुण-१०)**
३) जंगलात शेती शिवारात आग लागू नये या करिता गावातील मिटिंग मध्ये बनवलेले नियम हे गावातील प्रमुख याने दवंडी देणे. महिन्यातून किमान एकदा या नियमांची मुनादी देणे. हि नियमावली चावडी वर लावणे, चावडी वाचन करणे.**(गुण-१०)**
४) गावकऱ्यांनी गावातील १०-१५ युवकांची आगीच्या घटनांवर लक्ष ठेवणारी आग नियंत्रण टीम तयार करणे. गावाशेजारील जंगलात आग लागल्यास वनरक्षकांच्या मदतीला जाणे. **(गुण-१०)**
५) गावकऱ्यांनी जंगलात आग लागेल अशी कामे करु नये. जसे की, शेतातील कचरा गोळा करुन जाळताना धुरे जाळतांना आग पसरु नये याबाबत सर्वोपतरी काळजी घेणे. **(गुण-१०)**
६) गावपरिसर व बफर क्षेत्रात मोहा फुल वेचतांना त्या झाडाखालील कचरा झाडून मग फुले वेचावी. मोहाच्या झाडाखाली आग लावू नये. मोह फुले वेचतांना साडी, ताडपत्री चा वापर करावा. **(गुण-०५)**
७) गावपरिसर व बफर क्षेत्रात तेंदू पाने झाडांना जास्त यावी, या करिता आग जंगलात लावू नये. **(गुण-०५)**
८) गवत जास्त उगवावे या करिता सागाच्या जंगलात आगी लावणे थांबवावे. आगीच्या हंगामात फायर ब्लोअरचा वापर करणे. **(गुण-१०)**
९) गावात जनावरांच्या चराई करिता कुरण विकास कार्यक्रम घेणे. **(गुण-१०)**
१०) गावाशेजारील जंगलात आग लावू नये या करिता नावीन्यपूर्ण संकल्पना राबविणे. **(गुण-२०)**

**"अंगार मुक्त पेंच"( Fire Free Pench)कार्यक्रमाचे मूल्यांकन कोण करेल कसे करेल**

१. या स्पर्धेकरिता उपरोक्त मुद्या पैकी जे गाव सर्वात जास्त मुद्यावर काम करेल असे पहिले ३ गाव या बक्षिसाचे मानकरी असतील.
२. प्रत्येक गावातील वनपाल/वनरक्षक/टीम यांनी प्रामाणीकपणे आपल्या अधिनस्त असलेल्या गावाचे मूल्यांकन ३ महिने करतील. समितीने मूल्यांकन वनपाल तपासून स्वाक्षरीसह सादर करतील. व वनक्षेत्रपाल २५%गावाचे Cross Cheking करून विभागीय कार्यालयास सादर करावे.
३. पेंच व्याघ्र प्रकल्पातंर्गत अंगार मुक्त गावाची पाहणी करण्याकरीता गठीत समिती, वनरक्षक, वनपाल यांचे मदतीने मुल्यांकन करून नोंदी घेत राहतील.
४. वनपाल, वनरक्षक, गावकरी यांनी आपल्या गावाचे वरील १० मुद्यावर आधारित फोटो काढावे, व सदर स्पर्धेच्या ग्रुप वर टाकावे. तसेच फोटो अल्बम व रजिस्टर बनवतील.
५. दिनांक १५फेब्रुवारी ते १५ जून २०२३ पर्यंत हि स्पर्धा चालेल व सर्व वनपाल, वनरक्षक यांनी १५फेब्रुवारी ते १५ जून २०२३ पर्यंत मुल्यांकन नोंदी पंधरवाडी अहवाल विभागीय कार्यालय येथे जमा करावी.
६. स्पर्धेत सहभागी गावाचे मूल्यांकन गठीत समिती मार्फत करण्यात येईल.
७. सदर समितीस Fire Alert System बाबत माहिती विभागीय कार्यालयास उपलब्ध करुन देईल.
८. सर्व अधिकारी कर्मचारी, EDC सदस्य यांचे FSI, NASA या पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी.
९. सदर समितीस संपुर्ण स्पर्धेच्या वेळेत जनजागृती व संबंधित कामास रु.५०००/- इतका खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे.

तरी सदर अंगार मुक्त क्षेत्राच्या विजेच्या गावांना खालील प्रमाणे बक्षिस देण्यात येईल .

| ***बक्षिस*** | ***रक्कम*** |
|---|---|
| **प्रथम** | **५१०००/-** |
| **व्दितीय** | **३१०००/** |
| **तृतीय** | **२१०००/** |

**(डॉ. प्रभु नोर्थ शुक्ल)**
उपसंचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर

प्रतिलीपी :- वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प नागपुर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक)/रोहयो व वजी , पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलीपी :- वनपरिक्षेत्र अधिकारी, सर्व यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस रवाना.